# प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा
# सप्टेंबर-२०२१

## डी.एल.एड.
## परीक्षा-सप्टेंबर -२०२१
## अधिसूचना व ऑनलाईन
## आवेदनपत्र भरण्याचा कार्यक्रम

प्राचार्य, अध्यापक विद्यालये आणि प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत महत्वपूर्ण सूचना

**विशेष सूचना :-डी.एल.एड. परीक्षेचे दि. २०/०९/२०२१ ते दि. २८/०९/२०२१ या कालावधीत आयोजन केलेले आहे. सदर परीक्षेचे वेळापत्रक आपल्या माहितीस्तव यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल कृपया याची नोंद घ्यावी.**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद**
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे ४११ ००१
फोन:(०२०)२६१२३०६६, २६१२३०६७ फॅक्स:(२०)२६१२९९१९
website www.deledexam.in
Email - www.mscepune@gmail.com

**लिपिक अधीक्षक सहा. आयुक्त उपायुक्त आयुक्त तथा अध्यक्ष**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील डी.एल.एड्.
# परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नाव | हुद्दा | दूरध्वनी |
|---|---|---|---|
| | | | कार्यालय |
| १. | **श्री. तुकाराम सुपे** | **आयुक्त तथा अध्यक्ष** | **२६१२३०६६/६७** |
| २. | **श्रीम. शैलजा दराडे** | **उपायुक्त** | **२६१२३०६६/६७** |
| ३. | **श्री. अनिल गुंजाळ** | **सहा. आयुक्त** | **२६१२३०६६/६७** |
| ४. | **श्रीम. सीमा रांगडे** | **अधीक्षक** | **२६१२३०६६/६७** |
| ५. | **श्री. शशिकांत चिमणे** | **लेखाधिकारी** | **२६१२३०६६/६७** |

। टीप । - सदरचे दूरध्वनी क्रमांक फक्त तातडीच्या कार्यालयीन संपर्कासाठी आहेत. ते विद्यार्थी / पालकांना देऊ नयेत. कारण विद्यार्थ्यांची कोणतीही वैयक्तिक माहिती परिषदस्तरावर उपलब्ध नसते.
ती अध्यापक विद्यालय स्तरावर उपलब्ध असते.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| | सर्व अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे वेळापत्रक | ४ |
| १. | अध्यापक विद्यालयांनी Registration करणेबाबत सूचना | ५ |
| २. | परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्रे भरून सादर करण्याबाबतची नियमावली | ६ |
| ३. | ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता व परीक्षा शुल्क, संस्था नोंदणी शुल्क व विद्यार्थी नोंदणी शुल्क | ७ ते ९ |
| ४. | ऑनलाईन /विलंब शुल्काने/अतिविलंब शुल्काने आवेदनपत्र भरण्याचे वेळापत्रक | १० |
| ५. | प्रि-लिस्ट भरण्याबाबत घ्यावयाची दक्षता व डी.एल.एड. ५० अहवाल भरताना घ्यावयाची दक्षता | ११ |
| ६. | विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र भरणेसाठी मार्गदर्शक सूचना कृती ओघ तक्ता (Flow Chart) | १२ |
| ७. | ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणेबाबत सूचना कृतीओघ तक्ता (Flow Chart) | १३ |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा **: सप्टेंबर-२०२१**

## (D.El.Ed.)

सर्व अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे ते

विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वाटप करणेबाबत कामाचे

# वेळापत्रक

| अ.क्र. | कामाचा तपशील | दिनांक/कालावधी |
|---|---|---|
| १. | College Registration and Online Payment करणे. | २२/०६/२०२१ ते २५/०६/२०२१ |
| २. | DIET अधिनस्त अध्यापक विद्यालयांना Login ID आणि Password देणे व तपासून approve करणे.नविन रजिस्ट्रेशन केलेल्या अध्यापक विद्यालयांना approve करणे आवश्यक आहे. | २२/०६/२०२१ ते २५/०६/२०२१ |
| ३. | अध्यापक विद्यालयांनी २०१६ अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थीचे नियमित परीक्षा शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | २५/०६/२०२१ ते ०५/०७/२०२१ |
| ४. | २०१६ च्या अभ्यासक्रमातील जे विद्यार्थी केवळ प्रात्यक्षिक विषयात अनुत्तीर्ण असतील अशा विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक विषयाची ऑनलाईन आवेदनपत्रे नियमित शुल्कासह भरणे. (सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश मात्र जून २०१८ व त्यापुढील असावेत.) | २५/०६/२०२१ ते ०५/०७/२०२१ |
| ५. | विलंब शुल्क भरून ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | ०६/०७/२०२१ ते १३/०७/२०२१ |
| ६. | अतिविलंब शुल्क भरून ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | १४/०७/२०२१ ते २८/०७/२०२१ |
| ७. | प्राचार्य DIET यांनी परिषदेच्या संकेत स्थळावर परीक्षा केंद्र ऑनलाईन निश्चित करुन देणे. | २९/०७/२०२१ ते १२/०८/२०२१ |
| ८. | प्राचार्य DIET यांनी केंद्रसंचालकाची यादी ऑनलाईन निश्चित करुन देणे. | २९/०७/२०२१ ते १२/०८/२०२१ |
| ९. | सर्व अध्यापक विद्यालयांनी प्रिलिस्ट दुरूस्ती Online करणे. | १३/०८/२०२१ ते १९/०८/२०२१ |
| १०. | सर्व अध्यापक विद्यालयांचे अंतर्गत व प्रात्यक्षिक गुण डी.एल्.एड्.५० मध्ये Online भरणे. | ०१/०९/२०२१ ते ०६/०९/२०२१ |
| ११. | प्राचार्य DIET यांनी अधिनस्त अध्यापक विद्यालयांची डी.एल्.एड्. ५० तपासून Online approve करणे. | ०७/०९/२०२१ ते १३/०९/२०२१ |
| १२. | कोऱ्या उत्तरपत्रिका परिषदेमार्फत जिल्हा स्टेशनरी परिरक्षकाकडे पोहोच करणे. | ०५/०९/२०२१ ते ०८/०९/२०२१ |
| १३. | परिषदेच्या संकेतस्थळावर Online प्रवेशपत्रे उपलब्ध करणे. | १३/०९/२०२१ ते २०/०९/२०२१ |
| १४. | डी.एल्.एड्. परीक्षा सप्टेंबर – २०२१ चा प्रत्यक्ष कालावधी | २०/०९/२०२१ ते २८/०९/२०२१ |

**डी.एल.एड् परीक्षा सप्टेंबर-२०२१**

## अध्यापक विद्यालयांनी Registration करणेबाबत सूचना -

१) संगणकीय नोंदणी फॉर्म परिषदेच्या www.deledexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) www.deledexam.in ही वेबसाईट open केल्यानंतर Home page दिसेल. त्यामध्ये Institute Registration वर Click करावे. Institute registration फॉर्म दिसेल. तो फॉर्म प्रत्येक अध्यापक विद्यालयाने Online भरून Submit बटनावर Click करावे.

३) Submit केल्यानंतर भरलेली माहिती दिसेल त्यामध्ये दुरूस्ती करावयाची असल्यास go back बटनावर Click करून माहितीमध्ये दुरूस्ती करावी. दुरूस्ती करावयाची नसल्यास Online बटनावर Click करावे.

४) Online बटनावर Click केल्यानंतर तुम्ही Registration fee भरण्यासाठी Payment get way या पेजवर जाल. Pay Now या बटनावर Click करुन Online फी भरावी.

५) Online फी भरल्यानंतर पैसे भरल्याची Receipt generate होईल.

६) प्राप्त Receipt वर Successful Payment असे लिहून आले तरच तुमचे Payment successful झाले असे ग्राहय धरावे. Receipt ची Print काढून आपल्या दप्तरी ठेवावी.

७) Payment Successful झाल्यानंतर जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्थेच्या login ला नोंदणी फॉर्म प्राप्त होतील. ते तपासून झाल्यानंतर जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्थांनी Online Approval द्यावे.

८) त्यानंतर सर्व अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांच्या E-mail Id व Mobile नंबरवर User Id व Password येईल.

९) User Id व Password मिळाल्यानंतरच सर्व अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांचे Online आवेदनपत्रे दिलेल्या वेळापत्रकानुसार भरावीत.

## परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्रे भरून सादर करण्याबाबतची नियमावली

**परीक्षा कालावधी - दि.२०/०९/२०२१ ते २८/०९/२०२१**

**प्राथमिक शिक्षण पदविका (डी.एल.एड.) परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी परीक्षार्थी म्हणून पात्रतेचे निकष**

- परीक्षार्थीचा प्रवेश शासकीय कोट्यातील असल्यास राज्य शासनाने नियुक्त केलेल्या **'राज्य डी.एल.एड्. प्रवेश समितीने'** मान्य केलेला असावा.

- प्रवेश स्पॉट/व्यवस्थापन कोट्यातील असल्यास, प्रवेशास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली असावी.

- परीक्षार्थीची ८०% उपस्थिती पूर्ण होणे आवश्यक आहे.

- ८०% पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या परीक्षार्थींची अनुपस्थिती क्षमापित प्रकरणे दि. ०७/०९/२०२१ पूर्वी प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्था यांनी निकाली काढावीत.

- D.El.Ed. परीक्षार्थीचे अंतर्गत गुण ५०% किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

- डी.एल.एड. प्रथमवर्ष विद्यार्थ्यांचे आकारिक मूल्यमापन विद्या प्राधिकरणाने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा परिषदेच्या www.deledexam.in या संकेतस्थळावर गुणांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे आवश्यक आहे. एकदा गुण नोंदविल्यानंतर पुनःश्च गुणात बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

## - ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता -

**I)** परीक्षार्थीस लागू असणारा इयर कोड अचूकपणे निवडणे आवश्यक आहे कारण इयरकोडप्रमाणे परीक्षार्थ्याची सर्व माहिती संगणक पडद्यावर उपलब्ध होणार आहे. इयरकोडबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | इयर कोड क्रमांक |
|---|---|
| **प्रथम वर्ष नियमित विद्यार्थी (First year fresh only)** | **१** |
| **प्रथम वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी(First year repeater only)** | **२** |
| **द्वितीय वर्ष उत्तीर्ण असून फक्त प्रथम वर्षाच्या काही विषयास बसणारे विद्यार्थी (Second Year Pass & First year repeater only)** | **३** |
| **प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेस एकाच वेळी बसणारा विद्यार्थी (Appearing for first & second year)** | **४** |
| **द्वितीय वर्ष नियमित विद्यार्थी (Second year fresh only)** | **५** |
| **द्वितीय वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी (Second year repeater)** | **६** |

**II) सर्वसाधारण सूचना :-**

१) ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी माहिती पुस्तिका व सूचना वाचूनच माहिती भरावी.

२) द्वितीय वर्षाचे आवेदनपत्रे भरताना यापूर्वीचा नजिकच्या परीक्षेचा बैठक क्रमांक बिनचूक लिहावा. तो चुकीचा लिहील्यास अन्य विद्यार्थ्याची माहिती आवेदनपत्रावर येईल. त्याची जबाबादारी संबंधितांवर राहील. मागील गुणपत्रकावरून प्राचार्यांनी मागील बैठक क्रमांकाची पडताळणी करावी.

३) परीक्षा परिषदेने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावरच परीक्षार्थीस परीक्षा द्यावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदलता येणार नाही.

४) यापूर्वी डी.एल.एड. परीक्षेस बसलेल्या आणि गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांची प्रतिबंधित मुदत संपली असल्याची खात्री केल्यानंतरच भरावीत. गैरमार्गाचा अवलंब केलेल्या उमेदवारावर लादलेल्या शास्तीची मुदत संपण्यापूर्वी त्यांचे आवेदनपत्र परीक्षा परिषदेकडे आपणाकडून सादर झाल्यास **संबंधित प्राचार्य हे व्यक्तीशः जबाबदार राहतील व त्यामुळे उद्‌भवणा-या न्यायालयीन प्रकरणाचा खर्च त्यांना भरावा लागेल.**

५) प्रपत्र A मध्ये दिलेल्या तक्त्यातील मुद्दा क्र. ४ व ५ मधील माहिती ऑनलाईन भरावी व Submit बटनावर क्लिक करावे.

६) प्राचार्य, DIET यांनी जिल्ह्यातील प्रत्येक अध्यापक विद्यालयाची मंजूर क्षमतेची पडताळणी करूनच प्रपत्र 'A', 'B', 'C', 'D', 'E' Confirm करावीत.

७) अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी सोबत दिलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

**III)** **अ) परीक्षा पूर्व अटीची पूर्तता** : उमेदवाराने परीक्षेसाठी आवश्यक उपस्थिती व अंतर्गत काम पूर्ण केले आहे. (नियमानुसार संपर्क सत्रे पूर्ण झाली आहेत.)

**ब) प्रतिबंधित कालावधी** : गैरमार्ग प्रकरणी शिक्षा दिलेल्या उमेदवाराचा प्रतिबंधीत कालावधी पूर्ण झाला आहे.

**IV)** **अंतर्गत मूल्यमापनाचे गुणाबाबत (डी.एल.एड.)**

१) सर्व नियमित उमेदवारांचे व पुरवणी परीक्षार्थ्याचे अंतर्गत मूल्यमापनांचे गुण विहीत नमुन्यात (डी.एल.एड. ५०) न चुकता परिषदेने निर्धारित केलेल्या कालावधीत परीक्षा परिषदेकडे Online सादर करावेत. विहीत कालावधीत याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास व संबंधित उमेदवार प्रात्यक्षिक गुणाअभावी अनुत्तीर्ण घोषीत झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. अंतर्गत गुण नोंदविताना प्राचार्यांनी स्वतः खात्री करून घ्यावी.

२) डी. एल. एड. ५० मध्ये अंतर्गत गुण देताना कमाल मर्यादेपेक्षा जास्त गुण दिलेले नाहीत, याची पूर्णपणे खात्री करावी. किंवा विहीत मर्यादेपेक्षा कमी गुण दिलेले नाहीत किंवा निरंक गुणदान इ. चुका केल्यास संबंधित शिक्षक व प्राचार्य या दोघांनाही जबाबदार धरण्यात येईल.

**V)** ऑनलाईन आवदेनपत्रांची संपूर्ण छाननी झाल्यानंतरच विद्यार्थी सर्व नियम व अटीच्या संदर्भात पात्र आहे की अपात्र हे ठरविण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस आहे. तसेच **'परीक्षा दिल्यानंतरही संबंधितांच्या पात्रतेबाबत त्रुटी आढळल्यास संबंधितांची संपादणूक रद्द करण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस राहील'** याची संबंधितांनी नोंद घ्यावी. ही बाब सर्व परीक्षार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

**VI)** **परीक्षेचा कालावधी उमेदवारांच्या निदर्शनास आणण्याबाबत -** प्राथमिक शिक्षण पदविका सप्टेंबर-२०२१ च्या परीक्षेसाठी कालावधी निश्चित केलेले वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यानंतर उमेदवाराच्या निदर्शनास आणावे.

**VII)** **अपंगत्वाच्या सवलतीबाबत -** जे परीक्षार्थी ४०% किंवा त्याहून अधिक अपंगत्व असलेले आहेत त्यांनी ऑनलाईन आवेदनपत्र भरतेवेळी तसा पर्याय निवडावा. तसेच आवेदनपत्रासोबत उमेदवाराचा फोटो असलेले जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगत्व प्रमाणपत्राची छायांकित प्रत Scan करून Upload करावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२, दि.१८ मार्च २०१४ नुसार -

१. अपंग उमेदवाराला परीक्षेसाठी लेखनिक हा परीक्षा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्याची इच्छा असल्यास स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी.

२. परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.

३. अल्पदृष्टी उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनीटे वेळ देण्यात यावा.

४. उमेदवारास प्रश्नपत्रिका देताना व उत्तरपत्रिका परत घेताना त्यावर त्या त्या वेळेची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरवणीपत्रिका वेळेत पुरविण्यात याव्यात.

**VIII) परीक्षा शुल्क :** सप्टेंबर - २०२१ साठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

**१) संस्था नोंदणी शुल्क :**

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून संस्था नोंदणी शुल्क प्रतिवर्ष रु. २०००/- इतके करण्यात आलेले आहे. सदर शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. शुल्क भरल्याशिवाय अध्यापक विद्यालयास नोंदणी (Registration ) करता येणार नाही.

**२) विद्यार्थी नोंदणी शुल्क :**

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष (डी.एल.एड.) विद्यार्थी नोंदणी, प्रति विद्यार्थी शुल्क रु. २००/- इतके करण्यात आलेले आहे. परीक्षेचे आवेदनपत्र भरताना परीक्षा शुल्क, विद्यार्थी नोंदणी शुल्क एकत्रित ऑनलाईन भरावयाचे आहे.

**३) परीक्षा शुल्क**

**डी.एल.एड. परीक्षेसाठी**

| तपशील | शुल्क दर रूपये | परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्यात यावे. |
|---|---|---|
| लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा | प्रति विषय रू. ७५/- प्रमाणे | |

**सदर शुल्काचा तपशील विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी अध्यापक विद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावावा.**

परीक्षा शुल्क हे Screen वर दिसणाऱ्या पर्यायानुसार (Option) ऑनलाईन भरावयाचे आहे. त्याची पावती (receipt) आपल्याकडे जपून ठेवायची आहे.

## ऑनलाईन नियमित शुल्काने/ विलंब शुल्काने /अतिविलंब शुल्काने आवेदनपत्र भरण्याचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | नियमित शुल्क भरुन अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | २५/०६/२०२१ ते ०५/०७/२०२१ |
| २. | विलंब शुल्क भरुन अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | ०६/०७/२०२१ ते १३/०७/२०२१ |
| ३. | अतिविलंब शुल्कासह अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | १४/०७/२०२१ ते २८/०७/२०२१ |

**टिपः-** १) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि. २८/०७/२०२१ पर्यंतच वेबसाईट सुरु राहील.

२) दि. ०५/०७/२०२१ या तारखेनंतर आवेदनपत्र भरल्यास दि. १३/०७/२०२१ पर्यंत विलंब शुल्क रु. १००/- प्रति विद्यार्थी राहील व त्यानंतर आवेदनपत्र भरल्यास विलंब शुल्क रु. १००/- + अतिविलंब शुल्क रु. ५०/- प्रतिदिन प्रतिविद्यार्थी याप्रमाणे राहील.

३) कोणत्याही परिस्थितीत दि. २८/०७/२०२१ नंतर आवेदनपत्र भरता येणार नाहीत.

**महत्त्वाची सूचनाः-**ज्या अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वीच संबंधित विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क बँकेत भरले आहे, अशा अध्यापक विद्यालयांनी परीक्षा शुल्क परत मिळणेबाबत अर्ज करावा व त्यासोबत परीक्षा शुल्क भरलेले मूळ चलन जोडावे. त्यानुसार अध्यापक विद्यालयांना परीक्षा शुल्क परत करण्यात येईल.

१) पोस्टाने कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, ती रद्द समजण्यात येतील व त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

२) जो कालावधी ठरवून दिलेला आहे त्याच कालावधीमध्ये ऑनलाईन आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे. निर्धारित वेळेत आवेदनपत्र न भरल्यास, विद्यार्थ्यांना विलंब शुल्क भरावे लागल्यास, परीक्षेपासून परीक्षार्थी वंचित राहिल्यास त्याला संबंधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील.

३) अध्यापक विद्यालयांकडून डी.एल.एड. परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांची फी न भरता परीक्षेस प्रविष्ठ केले जाते. त्यामुळे Fee Pending म्हणून निकाल घोषित केला जात नाही. (राखीव ठेवला जातो.) यापुढे फी न भरता विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाही याबाबत सर्व विद्यालयाचे प्राचार्य यांनी विशेष दक्षता घ्यावी.

## प्रि-लिस्ट भरताना घ्यावयाची दक्षता-

www.deledexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर दि.१३/०८/२०२१ ते दि. १९/०८/२०२१ या कालावधीत प्रि-लिस्ट प्रसिध्द केली जाईल. त्यानुसार आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रातील त्रुटींमध्ये दुरूस्ती करता येईल. दि. १९/०८/२०२१ नंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही.

## अध्यापक विद्यालयांना डी.एल.एड. ५० भरण्याबाबत सूचना-

डी.एल.एड. परीक्षा सप्टेंबर २०२१ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे डी.एल.एड. ५० चे प्रात्यक्षिक गुण भरणेसाठी परिषदेच्या संकेतस्थळावर दि. ०१/०९/२०२१ ते ०६/०९/२०२१ या कालावधीत लिंक उघडून देण्यात येईल.

प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी आपल्या अधिनस्त सर्व अध्यापक विद्यालयांचे डी.एल.एड.५० दि. ०७/०९/२०२१ ते १३/०९/२०२१ या कालावधीत तपासून Approval देणे आवश्यक आहे.

दिलेल्या कालावधीमध्ये अचूक माहिती ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. सदर माहिती चुकीची भरल्यास त्याची जबाबदारी संबंधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य यांची राहिल.

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**

**डी.एल.एड्. परीक्षा सप्टेंबर - २०२१**

**विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरणेसाठी अध्यापक विद्यालयांना मार्गदर्शक सूचना**

**कृती ओघ तक्ता (Flow Chart)**

↓

Institute लॉगिंनवर गेल्यांनतर संबंधित अध्यापक विद्या. Login Id. व Password टाकून Sign in करावे.

↓

Institute Panel Open होईल.

↓

Student Registration वर Click करा.

↓

2016 Pattern वर डी.एल.एड दिसेल. त्यावर Click करा.

↓

2016 चा Pattern वर Click केले तर Student Information चा फॉर्म Open होईल.

↓

त्यामध्ये अगोदरच्या परीक्षेचा सीट नंबर भरा. तसेच त्या परीक्षेचे वर्ष भरा व Search बटनावर Click करा.

↓

विद्यार्थ्याची माहिती दिसेल त्या खालील सर्व Block भरा व Apply बटनावर Click करा.

↓

वरील बाजूस विद्यार्थ्याचा फोटो Uplod करा.

↓

विद्यार्थ्यांचे नाव, माध्यम, इन्स्टिटयुट कोड इत्यादी माहिती दिसेल व त्या खालील विषय कोड प्रमाणे विषय दिसतील व विद्यार्थी ज्या विषयांसाठी बसणार आहे ते विषय रेड कलरच्या रो मध्ये दिसतील.

↓

नंतर Next बटनावर Click करा.

↓

द्वितीय वर्षाचे विद्यार्थी ज्या विषयांसाठी परीक्षेला बसणार आहे ते Subjects दिसतील त्याची खात्री करुन Submit बटनावर वर Click केल्यानंतर रजिस्ट्रेशन पूर्ण होते.

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
## ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणेबाबत सूचना
## कृती **ओघ तक्ता** (Flow Chart)

Institute Panel वरील Payments वर Click केल्यानंतर
D.El.Ed. साठी 2016 Student Payment Option दिसतील.

↓

D.El.Ed. साठी 2016 वर Select केल्यानंतर
Student Exam Payment Panel दिसेल.

↓

त्यावर त्यातील Instrctuition प्रमाणे Fillter ड्रॉप डाउनमध्ये
All, Paid, व Pending हे Option दिसतील. त्यातील Pending Option Select करावा. नंतर Search बटनावर Click करावे.

↓

ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरावयाची आहे. त्या विद्यार्थ्यांची यादी तपशीलासह दिसेल.

↓

उजव्या बाजूला असलेल्या बॉक्समध्ये सर्व रजिस्टर झालेल्या विद्यार्थ्यांचे एकूण भरावयाचे परीक्षा शुल्क दिसेल व ते भरण्यासाठी ऑनलाईन बटनवर Click करा.

↓

त्यानंतर Payment gateway Open होतो. त्यावर Online Payment करावे.